# ओझेन ॲपे घंटागाड्याचे लोकार्पण

लोकमत

बुलडाणा दि.२६(जिल्हा प्रतिनिधी)



ओझेन घंटागाड्यांचे लोकार्पण करताना नगराध्यक्षा पूजाताई गायकवाड आदी.

**शहरात** ठिकठिकाणी घाण होत असल्याने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बुलडाणा नगर परिषदेने १२ व्या वित्त आयोगा निधी अंतर्गत १० ओझोन घंटागाड्या ऐवजी तुर्तास ५ नग ओझोन ॲपे घंटागाड्या व मृत झालेल्या प्राण्याचा वासाचा त्रास होऊ नये म्हणून १ नग बंदीस्त ओझेन ॲपे वाहनांचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा २६ सप्टेंबर रोजी पार पडला. प्रारंभी नगराध्यक्षा सौ.पुजाताई गायकवाड यांच्या हस्ते तसेच नगरसेवक संजय गायकवाड, आरोग्य सभापती दत्ता शंकर काकस यांच्या प्रमुख उपस्थितीत ओझोन ॲपे घंटागाड्याचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्षा सौ.पुजाताई गायकवाड म्हणाल्या की, शहरातील सर्व हॉटेल, खानावळी, चहाची दुकाने, किराणा दुकाने, मंगल कार्यालये इत्यादी छोटे, मोठे व्यवसायीक यांच्या व्यवसायामधून निघणारा दैनंदिन घनकचरा प्लॅस्टीक बकेट मध्ये साठवून ठेवून न.प.ची घंटागाडी घरासमोर, दुकानासमोर किंवा जवळच्या चौकात आल्याचा सायरन वाजल्यानंतर साठवून ठेवलेला कचरा घंटागाडीत आणून टाकावा. तसेच ज्या भागात घंटागाडी येणार नाही, त्याभागातील नागरिकांनी पालिकेत सूचना द्यावी व २४२३१८ ह्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

प्रायोगीक तत्वावर दैनंदिन घनकचरा संकलन करण्याचे काम सदर ओझोन ॲटो घंटागाड्या द्वारे सकाळी ८ ते १ वाजेपर्यंत करण्यात येईल, यासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

तसेच उर्वरीत घंटा गाड्याची खरेदीची कार्यवाही पूर्ण होताचजनतेच्या सेवेकरीता सुरु करण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी माजी उपाध्यक्ष ललीत बेदमुथा, अनिस मिर्झा, जाकीर कुरेशी, विजय गवई, मोईन काझी, श्रीकृष्ण मुठ्ठे, गजानन बदरखे, सुनिल बेंडवाल, राजेश भालेराव आरोग्य निरिक्षक गजेंद्र राजपूत लिपीक, किशोर गायकवाड लिपीक तसेच कर्मचारी उपस्थित होते.